

# चहा, भाजीचा व्यापार!

रायकरच्या खोलीत आसरा मिळाल्यानं जागेचा प्रश्न सुटला, असं त्या क्षणी वाटलं, पण मनाची खात्री होत नव्हती. रात्रीचे बारा वाजून गेले होते. मी आणि गाडगीळ, रायकरसमोर बसून राहिलो होतो. कोणीच काही बोलत नव्हतो. मला काही बोलवत नव्हतं. रायकरच्या या अनपेक्षित सहानुभूतीनं माझी वाचाच जणू बंद झाली होती. गेल्या काही महिन्यांत आलेल्या अनुभवामुळे रायकरनं केलेलं स्वागत खरं आहे की हाही एक भास आहे, हेच कळत नव्हतं. दुसरा एक विचार येत होता की, कदाचित अशा या मध्यरात्रीच्या वेळेला दाराशी आलेल्याला झिडकारणं बरं नव्हे, एवढ्याचमुळे तर रायकरनं आत यायला आणि राहायला सांगितलं नसेल? उद्या सकाळी तो कसा वागेल? काय करावं? आत्ताच स्पष्ट विचारावं का? उद्या जर इथून जायला लागणार असेल, तर त्याला आत्ताच का सामोरं जाऊ नये?

खरं म्हणजे रायकरनं ज्या भावनेनं, ज्या स्वरात आणि शब्दांत मला आपल्या खोलीत घेतलं होतं, त्यावरून त्याच्याविषयी असा विचार मनात येणं योग्य नव्हतं. पण गेल्या काही महिन्यांतला अनुभव माझ्या विचारांना रोखू शकत नव्हता. मी शेवटी मनाचा हिय्या केला आणि म्हटलं, ''रायकर-''

रायकरनं चटकन माझ्या खांद्यावर हात ठेवला. माझ्या मनातले विचार त्यानं ओळखले असावेत, माझा खांदा हळूच दाबून तो म्हणाला, ''सुधीर, आता काही बोलायचं नाही. एकच काम करायचं, स्वस्थ झोपायचं. आजपासून ही खोली तुझीच आहे.''

माझं मन एकदम हलकं झालं! मी उठलो, हातपाय धुतले, अंथरूण घातलं आणि एकदम झोपून गेलो. खूपखूप दिवसांनी खरीखुरी शांत झोप लागली.

सकाळी उठलो. आता नवीन जीवन सुरू झालं होतं. स्वच्छ अंघोळ केली. कपडे

धुतले. आम्ही उठायच्या आधीच रायकर 'महाराष्ट्र आयुर्वेद विद्यालया'त शिकवायला गेला होता. गाडगीळ आणि मी आरामात बसलो. इथं आम्हांला का बसलात, असं विचारणारं कोणी नव्हतं. आमच्याकडे थोडे पैसे होते. त्यामुळे दुपारचं जेवणही सुलभ होतं.

बाराच्या सुमारास रायकर आला. खूप वेळ आम्ही बोलत राहिलो. माझी सगळी हकीगत त्याला सांगितली. गाडगीळनं माझी साथ करून निष्कारण स्वत:वर संकट कसं ओढवून घेतलं, ते सांगितलं. रायकरनं त्याच्या उद्योगांची कल्पना दिली. तो थोडेबहुत पैसे मिळवत होता. पण त्यातले बहुतेक सार्वजनिक कार्यासाठीच खर्च करीत होता. 'युवक सन्मित्र मंडळ', 'महिला सेवा दल', 'विद्यागुणवर्धक अभ्यासमंडळ' या संस्था त्यानंच निर्माण केल्या, वाढवल्या. त्याबरोबरच 'आर्य चिकित्सा मंदिर' या नावानं घरीच दवाखानाही चालवीत होता. लहान वयातही रायकर 'महाराष्ट्र आयुर्वेद महाविद्यालया'त प्राध्यापक होता.

बोलण्यात किती वेळ गेला ते कळलंच नाही. मन इतकं शांत झालं होतं की, भुकेची आठवणच होत नव्हती. गेल्या काही महिन्यांत अनेक वेळा भुकेची आठवण जबरदस्तीनं मारावी लागत होती आणि आज भूक लागल्याचं कळतच नव्हतं. खिशात किती पैसे आहेत, याचा विचार येत नव्हता. मनात कसलीही धास्ती नव्हती. आता अशा जागेत होतो की, जिथून कोणी जायला सांगणार नव्हतं. आज आम्हीच रायकरला राइसप्लेट खायला घेऊन गेलो. मुंबईत ती दिवसभर मिळत असे.

**वर्गणी काढून जेवण**

जेवण करून आलो आणि मग रायकरनं विचारलं, "काय रे सुधीर, तुमच्याजवळ किती पैसे आहेत?" आम्ही आमचे खिसे त्याच्यापुढे झटकले. दोन-अडीच रुपये निघाले. रायकर म्हणाला, "एवढ्या पैशात एकवेळ जेवलात, तर आठ-दहा दिवस निघतील. पुढं काय करणार आहात?"

मी म्हटलं "दोन-चार दिवस जरा स्वस्थपणे घालवतो, मग विचार करून काहीतरी मार्ग काढू."

त्या रात्री रायकरनं एक योजना सांगितली. त्याच्याकडे एक स्टोव्ह होता, काही भांडी होती. त्यानं सुचवलं, "आपण तिघं रोज वर्गणी काढू. प्रत्येकानं दोन पैसे तांदळासाठी, एक पैसा दह्यासाठी आणि दोन पैसे आमटीसाठी द्यायचे. रॉकेल आपण आळीपाळीनं लागेल तसं घालू. एवढ्यात आपलं पोट भरेल. चहासाठी खर्च येईल तो वेगळा. तोही आपण वाटून घेऊ."

आम्हा दोघांना ही योजना एकदम पसंत पडली. दुसऱ्या दिवसापासून आम्ही हा प्रयोग सुरू केला. रायकरची जागा दुसऱ्या मजल्यावर म्हणजे दोन जिने चढून गेल्यावर होती. पहिल्या मजल्यावर एक खानावळ होती, तिथून आम्ही आमटी आणत असू. त्या खानावळीत एक चकणा वाढपी कामाला होता. त्याला एक बिडी दिली की, तो दोन

पळ्या जास्त आमटी देई. दीड आण्याचे तांदूळ, तीन पैशांच्या दह्याचं ताक आणि दीड आण्याची आमटी एवढ्यात आमचं तिघांचं पोटभर जेवण होई. रॉकेलचे पैसे वेगळे लागत. पण तेही दोन-तीन पैशांपेक्षा जास्त नसत.

हा क्रम पाच-सहा दिवस छान चालला. दोन वेळ पोटभर जेवण आणि दिवसभर आराम असा मस्त कार्यक्रम होता. गाडगीळ नोकरीसाठी पायपीट करत होता. मला काहीच करता येत नव्हतं. पाच-सहा दिवसांनंतर पेटी काढून थोडी थोडी गाण्याची प्रॅक्टिस करू लागलो.

वास्तविक रायकरच्या खोलीत मी उपरा आलेला. तरीपण पहिल्या दिवसापासूनच्या रायकरच्या वागण्यामुळं ती जागा आपली नव्हे, रायकरची आहे, ही भावनाच नाहीशी झाली. जणू काही ती स्वत:चीच जागा आहे, असं वाटायला लागलं. या जाणीवेचं प्रत्यंतरही लवकरच आलं.

रायकरचा भडसावळे नावाचा एक मित्र होता. एके दिवशी सकाळी तो त्याच्या एका मित्राला घेऊन आला. रायकर खोलीत नव्हता. म्हणून भडसावळे मला म्हणाला, ''हा माझा पुण्याचा एक मित्र आहे. पिंपुटकर याचं नाव. याला मुंबईत कुठंतरी राहायची सोय हवी आहे, म्हणून घेऊन आलो होतो. पण रायकर आल्यावर त्याला परत घेऊन येईन.'' मी पिंपुटकरकडे पाहिलं आणि मला काय वाटलं, कुणास ठाऊक! मी भडसावळेला म्हटलं, ''याला राहू दे इथं. मी सांगेन रायकरला. तू काही काळजी करू नकोस.''

वास्तविक रायकरच्या अपरोक्ष असं काही करायचा मला अधिकार नव्हता. हा माझा एकप्रकारचा आगाऊपणाच होता. रायकरला हे आवडलं नाही, तर मलाच त्या खोलीतून जावं लागलं असतं. पण हे सगळे विचार नंतर आले. पिंपुटकरला पाहाताक्षणी वाटलं, ते एकच की, हा माणूस आपल्या खोलीत हवाच. पिंपुटकरनं सामान आणून टाकलं. संध्याकाळी रायकर आल्यावर त्याला मी सांगितलं, ''रायकर, तुला न विचारता आणखी एका माणसाला मी आपल्या खोलीत राहायला सांगितलं आहे. पाहिल्याबरोबर मला तो चांगला वाटला. तू रागावू नकोस.''

रायकर शांतपणे म्हणाला, ''तुला चांगला वाटला ना? मग खुशाल राहू दे.'' रायकरच्या या बोलण्यानं मला खूपच बरं वाटलं.

तो दिवस माझ्याच काय पण रायकरच्याही आयुष्यातला अतिशय मौल्यवान दिवस आहे! मित्र आणि मैत्री या शब्दांवर माझा फारसा विश्वास नाही. काही अपवाद सोडले तर या दोन शब्दांनी माझं सारं आयुष्य पोखरून टाकलं आहे. त्या दिवशी मित्र आणि मैत्री या शब्दांतली सत्यता, उदात्तता सर्वार्थानं आणि पूर्णांशानं प्रत्यही प्रत्ययाला आणून देणारा एक स्वार्थत्यागी, जिवाला जीव देणारा आणि जीव ओवाळून टाकण्यासारखं प्रेम करणारा एक भाबडा जीव आमच्या आयुष्यात आला. त्याची नुसती आठवण झाली की, डोळ्यांना पाणी येतं. आयुष्यभर त्यानं माझ्यासाठी काय केलं आणि काय केलं नाही, याचं मला वर्णन करताच येणार नाही. माझ्यावर आणि माझ्या साऱ्या कुटुंबावर त्यानं नितान्त प्रेम केलं, भक्ती केली, आमच्यासाठी झिजला. हक्कानं अनेक गोष्टी त्यानं

माझ्याकडून करवून घेतल्या. मी आज जगात ताठ मानेनं उभा आहे, याचं फार मोठं श्रेय पिंपुटकरला आहे. तीन वर्षांपूर्वी तो या जगातून गेला. एका विशुद्ध मैत्रीला त्या दिवसापासून मी मुकलो.

पिंपुटकर आमच्या खोलीत राहायला आला आणि थोड्याच काळात त्यानं खोलीचा आणि आम्हा सर्वांचा कबजा घेतला.

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)

('जगाच्या पाठीवर' पुस्तकासाठी भारतातील संपर्क – दिलीप माजगावकर ४४७३४५९)